INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

महाराष्ट्रातील कोळी समाज
(Koli Samaj of Maharashtra)

डॉ. संतोष रघुनाथ कोळी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
पेठ वडगाव, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/11.2022-13798331/IRJHIS2211007

प्रस्तावना :

मराठी भाषेमध्ये कोळी जातीला कोळीच म्हटले जाते. महाराष्ट्रातील कोळी समाजाचे व्यवसायाच्या आधारावर तीन प्रमुख विभाग पाडले जातात. मच्छिमार कोळी, शेती करणारे कोळी, जंगलातील साधन संपत्ती गोळा करून उदरनिर्वाह करणारे कोळी अशी विभागणी कोळी जातीची केली जाते. त्यांची संस्कृती, राहणीमान, प्रथा व परंपरा यामध्ये सुध्दा मोठया प्रमाणत विविधता आढळते. पारंपारिक व्यवसायांवर अधारित पोटजाती आढळतात.

कोळी या प्राचीन जातीने आजपर्यंत अनेक आक्रमनांना तोंड दिले आहे. यामध्ये आर्यापासुन ते ब्रिटीश सरकारपर्यंत कोळी समाजावर अनेक अन्याय व अत्याचार झाले आहेत. प्रत्येक कालखंडात झालेल्या आक्रमणानंतर हा समाज अधिकच विखुरला गेला. त्यांच्या पूर्वजांनी आपले प्राण वाचवण्यासाठी अनेक वेळा स्थलांतर केल्याचे इतिहासात आढळते. ज्या भुप्रदेशात कोळयांची लोक गेली त्यांनी त्या प्रदेशातील भौगोलिक स्थितीनुसार व्यवसाय निवडले. त्याचाच परिणाम म्हणून आज आपल्याला देशाच्या विविध प्रदेशात राहणारा कोळी समाज भिन्नभिन्न व्यवसायात गुंतलेला दिसतो.

व्यवसायानुसार तीन प्रमुख विभाग :

❖ **महादेव कोळी :**

हे राज्यातील डोंगराळ भागात दाट वस्ती करून राहतात. यांचा समावेश आदिम जमातीमध्ये केला गेला आहे. त्यांची १९८१ च्या जनगणनेनुसार राज्यात ७,८७,४४८ इतकी लोकसंख्या आहे. यांचा राज्यातील अनुसूचीत जमातीमध्ये क्रमांक लागतो. ही जमात प्रामुख्याने अहमदनगर, पुणे जिल्ह्यातील डोंगराळ भागात आणि ठाणे व रायगड जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या उतारावर घाटपायथ्याला आढळते. त्यांची वस्ती समुद्रसपाटीपासून हजार ते चार हजार फुट उंचीवर असलेल्या पर्वतांच्या निर्जन अंतर्भागात असलेली आढळून येते. पुणे जिल्ह्यातील मुसा खोरे व उत्तरेस नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर व वणी पर्यंतच्या सुमारे २५०० चौ. मैलाच्या प्रदेशात या पोटजातीची वस्ती आढळते. वणात राहणारे कोळी म्हणून हा प्रदेश 'कोळवण' म्हणून ओळखला जातो. हेच महादेव कोळी यांचे मुळ वस्तीस्थान आहे.

महादेव कोळी या पोटजातीचा पहिला अभ्यासक कॅप्टन मॅकिन्टॉश याने असे नमुद केले आहे की, महादेव कोळी जमात महादेव टेकडयावरून खाली आली व त्यांनी घाट क्षेत्रात आपली वस्ती वसवली. या पोटजातीची पहिली वस्ती पुणे जिल्ह्यातील कुकडी व घोडनदीच्या खोऱ्यात होती. त्यानंतर त्यांनी नाशिक व अहमदनगर जिल्हयापर्यंत आपली वस्ती निर्माण केली. पुर्वेतिहासानुसार १४ व्या शतकात बहामनी राजाने त्यांच्यापैकी 'पोपेरा' या महादेव कोळयाला इ.स. १३४६ मध्ये कोकणातील जव्हार संस्थानाचा प्रमुख म्हणून नेमले होते.

महादेव कोळींचे राहणीमान अतिशय साधे होते. महादेव कोळी त्यांच्या झोपडीच्या भींतीना मातीने सारवत, तर छत गवताच्या पेंढयांनी झाकलेले असे. चुलीजवळ धुर जाण्यासाठी छतावर मोकळी जागा सोडलेली असे. उदरनिर्वाहासाठी हे लोक जंगलाच्या साधन संपत्तीवर अवलंबून राहत असत. जनावरे पाळणे, जळण गोळा करणे, शिकार करणे, जंगलातील औषधी वनस्पती गोळा करून विकणे हे त्यांचे व्यवसाय होते. कष्टाचे जीवन जगत असल्यामुळे यांची मुले, स्त्रिया या निसर्गत:च काटक व धाडशी बनत असत.

हा समाज तसा डोंगरातील शुर व लढवय्या आहे. यांच्या कणखर बाणा, पराक्रम व धाडसी वृत्तीच्या अनेक कथा प्रसिध्द आहेत. यांच्या या वृत्तीचा छत्रपती शिवाजी महाराजांनी योग्य उपयोग करून घेतला. भुपनगड, गंभीरगड, हरिश्चंद्रगड, शिवनेरी, सिंहगड अशा किल्ल्यांच्या संरक्षणाची जबाबदारी महाराजांनी या महादेव कोळयांना सोपवली होती.

महादेव कोळीमध्ये अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे. एखादे संकट आल्यास बळी देण्याची प्रथा त्यांच्यामध्ये आहे. 'भगत' हा त्यांचा पुढारी असतो. विवाहाला या पोटजातीत महत्त्व असून अविवाहितांना सामाजिक व धार्मिक जीवनात स्थान दिले जात नाही. लग्न समारंभ ३ ते ४ दिवस चालतात. लग्नात देण्या–घेण्याच्या प्रथा पाळल्या जातात. मृत्युनंतर मृतास पुरले जाते. मृत्युनंतर १० दिवस सुतक पाळणे बंधनकारक आहे. आजारपणात उपचार म्हणून भगत अंगारा धुपारा करतो. अलीकडे डॉक्टरांच्या उपचाराला प्राधान्य दिले जात आहे. न्यायनिवाडयासाठी जातपंचायतीवर अवलंबून राहिले जाते. जातपंचायतीचा निर्णय काटेकोरपणे पाळला जातो.

हा समाज एकजुटीने काम करत असतो. १९३३ सालचा जंगल सत्याग्रह आणि १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात महादेव कोळींनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला होता. या लोकांना सध्या शिक्षणाचे महत्व पटले आहे. अनेक जण उच्च शिक्षण घेऊन सरकारी पदावर नोकरी करत आहेत.

❖ **सोन कोळी**:

मुंबईतील समुद्र किनाऱ्याजवळ काही भागात ही पोटजात मोठया प्रमाणात आढळते. पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणारा, समुद्रमार्गे माल वाहतुक करणारा, पूर्वी दुर्ग राखण करणारा आणि आरमारात पराक्रम गाजवणारा अशी यांची ओळख आहे. आपल्या उत्पन्नातून सोन्यामध्ये गुंतवणूक करून वेळ प्रसंगी तेच सोने विकून भांडवल उभा करणारा तो सोनकोळी अशीही यांची वेगळी ओळख आहे. यांच्यात मामाच्या मुलीशी लग्न करण्याची प्रथा आहे. विधवांच्या पूनर्विवाहाची प्रथा आहे. कार्ल्याची एकवीरा आई

आणि जेजुरीचा खंडोबाची पूजा करतात. यांच्यात स्त्रीला मानाचे स्थान आहे. घराची सर्व जबाबदारी स्त्रिया सांभाळतात.

सोन कोळयांची पूर्वी वस्ती कुलाबा जिल्हयात होती. प्राणघातक रोगांच्या साथीमुळे त्यांनी स्थंलांतर केले. आज सोन कोळींची वस्ती मुंबई, वेसावे, खार, दांडा, जुहुतारा, चिंबई, सोनापूर लेन, मोडवी, माझगाव, शिव, शिवडी, कुलाबा येथे आढळते. त्यांच्या वस्तीला 'कोळीवाडे' म्हणून ओळखले जाते.

मुंबईतील मांडवी कोळीवाडयात ताजू नाखवा नावाचा श्रीमंत कोळी होता. त्याने आपल्या घरावर सोन्याची कौले बसवली होती. म्हणून त्यांच्या वंशजांना सोनकोळी हे नाव पडले असावे. तर काही सोनकोळींनी स्पष्टीकरणात असे म्हटले आहे की, आमचे कुलदैवत खंडोबा असल्याने त्यांचा भंडारा आम्ही कपाळाला लावतो. त्यामुळे उन्हामध्ये सोन्यासारखे चमकणारे म्हणून सोनकोळी हे नाव पडले आहे. सोनकोळी हे शब्द कसे उत्पन्न झाले, याबाबत निश्चित खुलासा आढळत नाही. कारण १९४० पुर्वी या शब्दाचा उल्लेख कुठेच झाल्याची नोंद नाही. एवढेच नव्हे तर सोन कोळयांच्या अनेक संस्था आणि शाळांना कोळी असेच संबोधले जाते.

कोळी महिला लग्न सराईत, सणात आणि उत्सवात वेशभुषा आणि केश भूषणांमध्ये सोन्याच्या दागिण्यांचा वापर मोठया प्रमाणात करतात. त्यांचा तो पेहराव पाहून इतरांनी कोळी ही जमात श्रीमंत व सुधारलेली आहे अशी नोंद सरकारी गॅझेटमध्ये केली आहे. तसेच मुंबईतील कोळींसाठीच 'सोनकोळी' या नावाची रेकॉर्डवर नोंद केली आहे. त्यामुळे हिंदु—कोळी जातीच्या एका पोटजातीची सोनकोळी म्हणून नोंद सरकारी दफ्तरात झालेली आहे.

❖ **मल्हार/ पाणभरे/ चुंबळ कोळी**:

मल्हारीचे भक्त असल्यामुळे यांना मल्हार कोळी म्हटले जाते. त्यांना पाणी भरण्याच्या कामावरून पाणभरे कोळी सुध्दा म्हटले जाते. काही ठिकाणी पाणी आणण्यासाठी दुरवर चालत जावे लागते. म्हणून हे लोक डोक्यावर चुंबळ ठेवतात. त्यावरून यांना चुंबळ कोळी म्हणून सुध्दा ओळखले जाते. हे ठाणे, मुंबई व राज्यातील इतर भागात आढळतात. १९८१ साली झालेल्या जनगणनेत यांची संख्या राज्यात १,७७,३६८ इतकी होती.

मल्हार कोळयांच्या ६० वेगवेगळया उपजमाती आहेत. त्यावरून त्यांची वराड, बावर, भोमटे, भोईटे, भोये, वसवंत, भबर, चकार, दळवी, डोंगरकर, धांगडे, काटकर, खटाली, वगैरे आडनावे आहेत. त्यांच्यात नात्यात विवाह होतात. मल्हार कोळी हिंदु धर्माला मानतात. आपले रितीरिवाज हिंदु पध्दतीने पाळतात. नारायण देव हे मुख्य दैवत आहेत. दिवाळी, होळी, नागपंचमी त्यांचे महत्वाचे सण आहेत. मल्हार कोळींचे महाराष्ट्रातील इतर कोळी जातींशी नातेसंबंध आहेत.

ग्रामीण भागात प्रत्येक कार्यक्रमामध्ये घरोघरी जाऊन पाणी भरण्याचे काम हे कोळी करत असत. त्याबदल्यात त्यांना धान्य, भाकरी अशा स्वरूपात मोबदला मिळत. कामावरूनच त्यांना पाणभरे कोळी हे नाव पडले. आज यांची पूढची पिढी शिक्षण घेऊ लागल्यामुळे त्यांना या कामाची लाज वाटते. त्यामुळे हा व्यवसाय हे कोळी करताना दिसत नाहीत.

निष्कर्ष :

१. महाराष्ट्रातील कोळी समाज हा विविध पोटजातीमध्ये विभागलेला पहायला मिळतो.

२. कोळी समाजातील सदस्यांचे उत्पन्न मर्यादित असल्यामुळे त्यांचा राहणीमानाचा दर्जा निम्न आहे.

३. समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणात्मक परिवर्तन झालेले नाही.

४. कोळी समाजाचा राजकीय व संघटनात्मक सहभागाचे प्रमाण अत्यल्प आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. भस्नेइया आर.सी. (२०११) 'कोली जाती का इतिहास', भारतश्री ग्राफिक्स, इंदोर,

२. मेहेर चंद्रकांत (२०१३) 'कोळी समाज', शुभाय प्रकाशन, मुंबई

३. http://hdl.handle.net/10603/399673